168

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी : (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
मेल : estt6mjp@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०२४/प्र.क्र.३६/आ-६ दिनांक :- २७ .६.२०२५

**म.जी.प्रा.च्या आस्थापनेवरील कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य-पदवीकाधारक) या सरळसेवा, जिल्हा परिषदेच्या कोटयातील पदांवर तदर्थ पदोन्नती.**

## // आदेश //

वाचा : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र. मजीप्रा-११२२/प्र.क्र.२४/ पापु-२३, दिनांक १४.५.२०२५ व २७.५.२०२५

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक १४.५.२०२५ व २७.५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणाऱ्या सरळसेवेच्या कोटयातील व जिल्हा परिषदेच्या कोटयातील एकूण ३० पदे प्राधिकरणातील शाखा अभियंता (स्थापत्य) यांना ११ महिन्याच्या कालावधीकरीता तदर्थ पदोन्नतीने भरण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता दिलेली आहे.

अ) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधीत अधिकाऱ्याला सेवा ज्येष्ठताचा कोणताही लाभ अनुज्ञेय नसेल. विहीत कालावधीनंतर सदर तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल व या संदर्भात संबंधीत अभियंत्यांकडून पदोन्नतीपूर्वी बंधपत्र प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी सदस्य सचिव, मजीप्रा यांची राहील.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ७.५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनेनुसार, मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार भरावयाची आहेत. ही बाब विचारात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेल्या खालील कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (स्थापत्य) यांना रुपये S-२० : ५६१००-१७७५००/- या वेतनश्रेणीत तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

| म.जी.प्रा. नवी मुंबई | |
|---|---|
| उप अभियंता | |
| शाखा | |
| आवक क्र. | |
| दिनांक:- | |

Recd 9/7/25

.२/-

सदर पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने उप अभियंता (स्थापत्य-पदवीकाधारक) या संवर्गातील पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तात्पुरती पदोन्नती देऊन पुढील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये दर्शविल्यानुसार पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता (स्था.) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | पदोन्नतीनंतर पदस्थापनेच्या कार्यालयाचे नांव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.सुर्यकांत वसंतराव देशमुख | म.जी.प्रा.विभाग क्र.२, पुणे | म.जी.प्रा.उपविभाग, इंदापूर, जि.पुणे | रिक्तपदी |
| २ | श्री.किशोर काशिनाथराव खरोसेकर | म.जी.प्रा.मंडळ, लातूर | म.जी.प्रा.विभाग, लातूर | रिक्तपदी |

३. पदोन्नत शाखा अभियंता (स्थापत्य) यांना खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेनुसार सरळसेवेच्या/ जिल्हा परिषद कोटयातील रिक्त उप अभियंता (स्थापत्य-पदवीकाधारक) या पदांवर तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे.

अ) पदोन्नत कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (स्थापत्य) यांना उप अभियंता (स्थापत्य-पदवीकाधारक) या पदावर दिलेली तदर्थ पदोन्नती ही शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई यांचे शासन निर्णय दि.७.५.२०२१ अनुसार तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दिनांक ४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तदर्थ / तात्पुरत्या स्वरूपात दि.२५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहे.

ब) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच भविष्यात म.जी.प्रा.ची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसुचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम" (Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल.

क) सदर पदोन्नती ही संबधीत अभियंता यांनी लिहून दिलेल्या बंधपत्राच्या अधीन राहून देण्यात येत आहे. त्यामुळे तदर्थ पदोन्नत अधिकाऱ्याला सेवा ज्येष्ठतेचा कोणताही लाभ अनुज्ञेय नसेल. विहीत कालावधीनंतर सदर तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल.

.३/-

ड) तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांच्या शाखा अभियंता (स्था.) संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार, त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

इ) तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्था.) यांनी त्यांच्या नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ रुजू व्हावे, तसेच सदर पदाचा पदभार स्विकारल्यानंतर त्याचा अनुपालन अहवाल मध्यवर्ती कार्यालय/संबंधित मुख्य अभियंता कार्यालयास सादर करावा.

ई) उप अभियंता (स्था.) पदावरील तदर्थ पदोन्नती ही, त्यांचे विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यंत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही, या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

४. तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांनी उप अभियंता (स्थापत्य) पदी दिलेली पदोन्नती स्वीकृत न केल्यास, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन/ १९९९/प्र.क्र.२/ ९९/ सेवा-३, दि.२०.७.२००१ अन्वये संबंधीतास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा म्हणजेच उप अभियंता पदाच्या वेतनश्रेणीचा लाभ दिला असेल तर सदर लाभ काढून घेण्यात येईल. या अनुषंगाने पदोन्नती स्वीकृत न करणारे कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (स्था.) यांचे प्रकरणी संबंधीत कार्यालयाने उचित कार्यवाही करावी.

५. तदर्थ पदोन्नत उप अभियंता यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती संबंधीचा विकल्प एक महिन्याच्या आत संबंधीत कार्यालयास सादर करावा. विकल्प न दिल्यास त्यांची वेतननिश्चिती सरळ म.ना.से.(वेतन) नियम-१९८१ मधील नियम- ११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन केली जाईल.

६. तदर्थ पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य) यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना ही प्रशासकीय बाब असल्याने, त्यांना नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

मान्यतेने,

(गजानन गुरव)
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत : माहितीस्तव सादर.**

मा.मंत्री, पा.पु.व स्व. तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री, पा.पु.व स्व. तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव.
मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, पुणे/ छत्रपती संभाजीनगर.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुख्यालय, मुंबई / गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडको भवन / म.नि.स.स.कक्ष, मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे/ लातूर
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग क्र.२, पुणे / लातूर
- उप अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आय.टी.सेल, सिडको भवन, नवी मुंबई
- लेखा अधिकारी (रोखशाखा), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई
- कक्ष अधिकारी, आस्था-१ (उविअ)/ आस्था-२ (विचौ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
- श्री.सुर्यकांत वसंतराव देशमुख, पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य-पदवीकाधारक) यांना माहितीसाठी.
- श्री.किशोर काशिनाथराव खरोसेकर, पदोन्नत उप अभियंता (स्थापत्य-पदवीकाधारक) यांना माहितीसाठी.
- कार्यालयीन आदेश धारिका.